प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

दिनांक 25 जून 2018

# दर सोमवारी अभ्यागत (Visitors) भेटू शकणार सिडकोच्या विभागप्रमुखांना

सिडको महामंडळ नेहमीच आपल्या दैनंदिन कार्यात त्याचप्रमाणे नागरिकांशी संबंधित बाबींमध्ये पारदर्शकता जपते. त्याचप्रमाणे सिडकोतील अधिकारी व नागरिक यांच्यामधील दरी कमी कशी करता येईल याबाबतीत नेहमीच प्रयत्नशील असते. याचाच एक भाग म्हणजे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. लोकेश चंद्र** यांच्या निर्देशानुसार आता अभ्यागतांना कोणतीही पूर्व वेळ (Appointment) न घेता दर सोमवारी दुपारी 2 ते 3 या वेळात सिडकोतील विभागप्रमुखांना भेटता येणार आहे.

नागरीकांच्या समस्यांवर समोरासमोर चर्चा होऊन त्यावर लवकरात लवकर तोडगा निघून त्यांची कामे वेळेवर मार्गी लागावीत यासाठी सिडकोतर्फे हे पाऊल उचलण्यात आले आहे. दर सोमवारी नागरिक कोणतीही पूर्व वेळ – पूर्व परवानगी न घेता त्यांच्या कामाशी संबंधित विभाग प्रमुखास थेट भेटू शकतात. यातून नागरीकांचे प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यास मदत होणार आहे.

संपूर्ण आठवड्यातील कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत दुपारी 2 ते 4 वेळेत नागरिक त्यांच्या कामाशी संबंधित विभाग प्रमुखांना नेहमीप्रमाणे भेटू शकतात. परंतु दर सोमवारी दुपारी 2 ते 3 ही वेळ केवळ अभ्यागतांना भेटण्यासाठी राखीव ठेवण्यात आली असल्याने नागरीकांना याचा नक्कीच फायदा होऊ शकतो.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**